# सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित २०० पेक्षा कमी खाटा असलेल्या रुग्णालया करिता आहार सेवा पुरविण्यासाठी महिला स्वयं-सहाय्यता बचत गटांची निवड करण्यासाठीचा जाहिरात नमुना

| | | |
|---|---|---|
| ➢ कार्यालयाचे नाव | : | जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, नांदेड. |
| ➢ कार्यालयाचा पत्ता | : | जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, नांदेड. |
| ➢ कार्यालयाचा ई-मेल | : | cs_nanded@rediffmail.com |
| ➢ संपर्क क्रमांक | : | ०२४६२-२३४७५० /२४५५१६ |
| ➢ जा. क्र.: (जाहिरात क्रमांक/२०२६) | : | जा.क्र.जिशचि/९७००/दि.१७/०८/२०२६ |
| ➢ दिनांक | : | १७/०८/२०२६ |
| ➢ जाहीर ई-निविदा/ अर्ज मागविण्याबाबत जाहिरात | : | |

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत नांदेड जिल्हा/तालुका कार्यक्षेत्रातील २०० पेक्षा कमी खाटा असलेल्या शासकीय रुग्णालयांमध्ये ( जिल्हा/ सामान्य/ महिला/ उपजिल्हा/ ग्रामीण व इतर रुग्णालयात) दाखल असणाऱ्या रुग्णांना दररोज सकस व दर्जेदार आहार सेवा (Catering Service/Diet Service) पुरविण्यासाठी नोंदणीकृत महिला बचत गट/ महिला स्वयं-सहायता गट (SHG) यांच्याकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

**रुग्णालय निहाय तपशील:**

| | | |
|---|---|---|
| १ | ग्रामीण रुग्णालय (RH): १२ | अर्धापूर, मालेगाव, भोकर, धर्माबाद, हिमायतनगर, कंधार,मांडवी, माहूर, बारड, मुदखेड, नायगाव, उमरी |
| २ | उपजिल्हा रुग्णालय (SDH) : 0६ | मुखेड, बिलोली,देगलूर, हदगाव, गोकुंदा, लोहा |
| ३ | स्त्री रुग्णालय (Woman Hospital) : ०१ | नांदेड |
| ४ | जिल्हा रुग्णालय (District Hospital) : ०१ | नांदेड |



Scanned with CamScanner

**मुख्य अटी व शर्ती :**

1. पात्रता: अर्जदार महिला बचत गट / स्वयं सहायता गट हा किमान (२) वर्षे जुना व नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.
2. अनुभव: बचत गटाला केटरिंग, भोजनालय किंवा आहार पुरवठयाचा पूर्व अनुभव असलेल्या गटास प्राधान्य दिले जाईल.
3. FSSAI नोंदणी: अन्न सुरक्षितता आणि मानके प्राधिकरणाची (FSSAI) नोंदणी/ परवाना असणे अनिवार्य आहे.
4. बँक खाते : बचत गटाचे राष्ट्रीयकृत/ शेड्युल्ड बँकेत सक्रिय बँक खाते व पॅन कार्ड असणे आवश्यक आहे.
5. रुग्णालयाच्या नियमानुसार व आहार वेळापत्रकानुसार रुग्णांना वेळोवेळी (चहा, दुध, नाष्टा, दुपारचे भोजन, संध्याकाळचा चहा व रात्रीचे भोजन व दुध) पुरविणे बंधनकारक राहील.

**अर्जाचे वेळापत्रक:**

- अर्ज मिळण्याचे व जमा करण्याचे ठिकाण: जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, नांदेड.
- संकेतस्थळ : (https://ahaar.maharashtra.gov.in/portal)
- आहार सेवेकरिता करावयाचा अर्ज https://ahaar.maharashtra.gov.in/portal या संकेतस्थळावर उपलब्ध आहे .
- अर्ज स्वीकारण्याचा कालावधी : दिनांक १९/०८/२०२६ ते दिनांक ०३/०९/२०२६ (सकाळी १०.०० ते सायंकाळी 06.०० वाजेपर्यंत, शासकीय सुट्टीचे दिवस वगळून)
- अर्ज सादर करण्याचे अंतिम मुदत: दिनांक ०३/०९/२०२६ सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत
- अर्जाची छाननी :दिनांक ०४/०९/२०२६ ते दिनांक ०७/०९/२०२६
- अंतिम गुणांकन यादी प्रसिद्ध करणे : दिनांक ०८/०९/२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत
- अंतिम गुणांकन यादीवर त्रुटीची पूर्तता करणे: दिनांक ०९/०९/२०२६ ते १२/०९/२०२६ रोजी संध्याकाळी 06.०० वाजेपर्यंत.
- त्रुटीची पूर्तता करून पात्र महिला स्वयं सहायता गटांची गुणांकन यादी करणे: दिनांक १२/०९/२०२६ ते १५/०९/२०२६ रोजी संध्याकाळी 06.०० वाजेपर्यंत.
- अंतिम गुणांकन यादी प्रसिद्ध करणे: दिनांक १६/०९/२०२६ .
- गुणांकन यादीस उपसंचालक आरोग्य सेवा (परिमंडळे) यांची मान्यता घेणे: दिनांक १९/०९/२०२६ ते २१/०९/२०२६.



Scanned with CamScanner

- कार्यादेश निर्गमित करणे: दिनांक २१/०९/२०२६ ते २२/०९/२०२६.
- कार्यादेश देण्यात आलेल्या महिला स्वयं – सहायता गटामार्फत आहार सेवा सुरू करणे: कार्यादेशापासून दिनांक २/१०/२०२६ पर्यंत.

**आवश्यक कागदपत्रे (अर्जासोबत जोडावयाची साक्षांकित सत्यप्रत):**

- बचत गट नोंदणी प्रमाणपत्र (MSRLM/MAVIM/ नगरपरिषद/ पंचायत समिती कडील दाखला).
- बचत गटाचा पॅन कार्ड (PAN card) आणि पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत.
- FSSAI फूड लायसन्स/ नोंदणी प्रत.
- बचत गटाच्या सदस्यांची यादी व ठराव प्रत (सदर कामासाठी अर्ज करण्यास मान्यता असल्याचा ठराव)
- मागील १ ते २ वर्षाचे बँक स्टेटमेंट.
- अनुभव प्रमाणपत्र (असल्यास).

**टीप:** अर्जाचा नमुना, नियम, अटी, शर्ती आणि मेनू (आहार तक्ता)बाबतची सविस्तर माहिती वरील नमूद कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील. कोणतेही कारणे न देता अर्ज स्वीकारणे किंवा नाकारणे याचे अधिकार जिल्हास्तरीय निवड समिती कडे राखून ठेवण्यात आले आहेत.

स्वाक्षरी

**डॉ. संजय माणिकराव पेरके**
**जिल्हास्तरीय निवड समिती अध्यक्ष, तथा**
**जिल्हा शल्य-चिकित्सक, नांदेड**



Scanned with CamScanner